स्यातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६**
Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_pune@rediffmail.com

---

## -: कार्यालयीन आदेश :-

**विषय :** वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपिक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भः** १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दिनांक ८ जून १९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै २००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दिनांक ११ जानेवारी २००२.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दिनांक १ एप्रिल २०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभागक्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दिनांक ५ जुलै २०१०.
६) शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९/०१/२०१३.
७) शासन निर्णय, वित्त विभागक्र.आप्रयो १०१४/प्र.क्र.२१/सेवा-३, दि.६ सप्टेंबर, २०१४.
८) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मप्रन्या-२०१२/प्र.क्र.६९/२०१२ /सेवा-३, दि.७ ऑक्टोबर, २०१६.
९) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९ /सेवा-३, दि.०२ मार्च, २०१९.

संदर्भ (१) दिनांक ८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी २००२ च्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब मधील राजपत्रित

व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै २००१ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र. (५) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे.** ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे. घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर शर्ती व अटीचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

संदर्भ क्र.(४) दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र. (५) शासन निर्णय दि.५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत कमाल दोन वेळा वेतनसंरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

संदर्भ क्र.(६) दि.१९.०१.२०१३ अन्वये, नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची तत्पूर्वीची समकक्ष पदावरील नियमित सेवा कालबध्द पदोन्नती /आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहेत.

संदर्भ क्र.(७) दि.०६.०९.२०१४ च्या शासन निर्णयान्वये, पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.(८) दि.७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये, कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी तात्पुरती नियमित/अखंडीत सेवा देखील विचारात घेणेबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहेत.

संदर्भ क्र.(९) दि.०२ मार्च, २०१९ अन्वये शासनाने सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय केली आहे. सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१/०१/२०१६ पासून अंमलात आली आहे. ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षांच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे त्यांना २० (१२+८) व ३० (२४+६) एवढया वर्षांच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार, यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करावयाचा आहे.

उपरोक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०२ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील **प्रथम लिपिक व वरिष्ठ लिपिक गट-क (अराजपत्रित)** संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला/दुसरा / तिसरा लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

०१. वरिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.

अ) सातव्या वेतन आयोगानुसार वरिष्ठ लिपिक पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-८-(२५५००-८११००)

ब) सातव्या वेतन आयोगानुसार सु.से.आ.प्र.यो.चा पहिला लाभ अनुज्ञेय केल्यानंतर अनुज्ञेय होणारी प्रथम लिपिक पदाची वेतनश्रेणी एस-१३-(३५४००-११२४००).

| अ. क्र. | नाव व सध्याचे पदनाम | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | सध्याच्या पदावर नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीमती सुरेखा सुमेध खरवडकर, प्र.लिपिक | खुला | ०३/०१/२०१२ | ०३/०१/२०२२ | दि.०१/०६/२०२२ पासून प्रथम लिपिक पदावर प्रत्यक्ष पदोन्नती. |
| २ | श्रीमती सुनंदा रामराव पालवी (सुनंदा रामदास गवांदे), व.लिपिक | अनु. जमाती (वैध) | ०३/०१/२०१२ | ०३/०१/२०२२ | --- |
| ३ | श्रीमती अनुराधा मि. तायडे (अनुराधा उमराव मनोहर), प्र.लिपिक | अ.जा. (वैध) | ०३/०१/२०१२ | ०३/०१/२०२२ | दि.०६/०७/२०२२ पासून प्रथम लिपिक पदावर प्रत्यक्ष पदोन्नती. |

०२. विद्यमान कनिष्ठ लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.

अ) सातव्या वेतन आयोगानुसार कनिष्ठ लिपिक पदाची विद्यमान वेतनश्रेणी एस-६-(१९९००-६३२००)

ब) सातव्या वेतनआयोगानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणारी वरिष्ठ लिपिक पदाची वेतनश्रेणी एस-८-२५५००-८११००

| अ. क्र. | नाव व सध्याचे पदनाम | जातीचा प्रवर्ग/ जाती दावा वैध/अवैध | सद्याच्या पदावर नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेला दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.राजन गजानन बेंद्रे, व.लिपिक | इ.मा.व. (वैध) | ०९/०२/२०१० | ०९/०२/२०२० | दि.२०/०८/२०२१ पासून वरिष्ठ लिपिक पदावर प्रत्यक्ष पदोन्नती. |
| २ | श्री.मोहन चंद्रकांत कांबळे, क. लिपिक | अ.ज. (वैध) | १४/०१/२०११ | १४/०१/२०२१ | दि.१४/०१/२०२१ पासून पहिला लाभ मंजूर करुन त्यांनी दि.२०/०८/२०२१ रोजी व.लि. पदावरील पदोन्नती नाकारल्याने दि.२०/०८/२०२१ पासून सदरहू लाभ काढून घेण्यात येत आहे. |
| ३ | श्रीमती.प्राची विजय अनासाने, क.लिपिक | इमाव (वैध) | ०१/०३/२०११ | ०१/०३/२०२१ | दि.०१/०३/२०२१ पासून पहिला लाभ मंजूर करुन त्यांनी दि.३१/०८/२०२१ रोजी व.लि. पदावरील पदोन्नती नाकारल्याने दि.३१/०८/२०२१ पासून सदरहू लाभ काढून घेण्यात येत आहे. |
| ४ | श्रीमती. सुजाता शिवाजी नागणे, क.लिपिक | खुला | ०९/०३/२०११ | ०९/०३/२०२१ | दि.०९/०३/२०२१ पासून पहिला लाभ मंजूर करुन त्यांनी दि.३१/०८/२०२१ रोजी व.लि. पदावरील पदोन्नती नाकारल्याने दि.३१/०८/२०२१ पासून सदरहू लाभ काढून घेण्यात येत आहे. |
| ५ | श्री.अविनाश प्रेमसिंग राठोड, व.लिपिक | वि.जा.अ (वैध) | ०४/०६/२०११ | ०४/०६/२०२१ | दि.०१/०९/२०२१ पासून वरिष्ठ लिपिक पदावर प्रत्यक्ष पदोन्नती. |
| ६ | श्री.पवन बाबुराव धांदरे, क.लिपिक | अ.जा. (वैध) | २०/१२/२०११ | २०/१२/२०२१ | --- |

०३. वरील कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ पुढील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. जे कर्मचारी सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांच्या बाबतीत ते प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी ज्या कार्यालयात कार्यरत होते / ज्या जिल्हयात कार्यरत होते त्या शाखा कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी.

३. जे कर्मचारी या आदेशाच्या दिनांकास सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांच्याबाबत ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या कार्यालयाने त्यांना वरील योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी. तसेच जे अधिकारी/ कर्मचारी प्रतिनियुक्तीने कार्यरत असताना सेवानिवृत्त झाले आहेत अशा अधिकाऱ्यांची वेतन निश्चिती संबंधित विभागीय कार्यालयाने करावी व ज्या कार्यालयाने सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना निवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करुन अदा केले आहेत त्या कार्यालयाने/ आहरण व संवितरण अधिकाऱ्याने या आदेशानुसार संबंधितांस लाभाची रक्कम अदा करण्याबाबत विभागीय कार्यालयाच्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

४. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त कर्मचारी यांची नावे (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहातील.

५. उपरोक्त कर्मचारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

६. शासन निर्णय दि.१ जुलै २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

७. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे)**

२९/०८/२०२२

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/व.लि./क.लि./गट-क/ प्रशा-१/८४९१
मध्यवर्ती कार्यालये, पुणे – ४११ ००१
दिनांक -३० /८ /२०२२.

( वि.ल.वाघमोडे )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत :** मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत :** मा.महालेखापाल, मुंबई-१/नागपूर-२.

<u>प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :</u>

१) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग/ कोकण विभाग/नाशिक विभाग/ औरंगाबाद विभाग/ अमरावती विभाग.

२) सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर / रत्नागिरी / वर्धा / बुलडाणा .

३) उपअभियंता, अंमलबजावणी कक्ष, अं.क.,न.र., अमरावती / नाशिक.

४) भूमि संपादन विशेष अधिकारी क्र. (११), कोल्हापूर/ भू.सं.वि.अ.वि.घ., औरंगाबाद

५) कोषागार अधिकारी, -------------------

६) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, टिपीव्ही-१ / २ / ३ / ४ / ५ / ६ /७, प्रशा-१/ प्रशा-१अ /प्रशा-१ ब/ प्रशा-२/ लेखा / अर्थसंकल्प / रेखाकला

७) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.

८) संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.मा.प.कक्ष
//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

९) वैयक्तिक धारिका

१०) श्री.जाधवर, व.लि.प्रस्तुत आदेशामध्ये देण्यात आलेल्या सु.से.आ.प्र.योजनेच्या लाभाची नोंद ज्येष्ठता सूचीमध्ये घेण्यात यावी

<u>प्रत विहित मार्गाने रवाना.</u>

१) श्रीमती सुरेखा सुमेध खरवडकर, वरिष्ठ लिपिक, भूमि संपादन विशेष अधिकारी,वि.घ., औरंगाबाद कार्यालय.

२) श्रीमती सुनंदा रामराव पालवी, (सुनंदा रामदास गवांदे), वरिष्ठ लिपिक, उपअभियंता,अंमलबजावणी कक्ष,नाशिक. कार्यालय.

३) श्रीमती अनुराधा मि. तायडे (अनुराधा उमराव मनोहर), वरिष्ठ लिपिक, सहसंचालक,नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई कार्यालय.

४) श्री.अविनाश प्रेमसिंग राठोड, वरिष्ठ लिपिक, सहायक संचालक,नगर रचना, वर्धा शाखा कार्यालय.

५) श्री.राजन गजानन बेंद्रे,व.लिपिक, सहायक संचालक,नगर रचना,रत्नागिरी शाखा.

६) श्रीमती प्राची विजय अनासाने, कनिष्ठ लिपिक, उपअभियंता,अंमलबजावणी कक्ष,अमरावती.

७) श्री.मो.चं.कांबळे, कनिष्ठ लिपिक, भूमी संपादन अधिकारी,क्र.११, कोल्हापूर कार्यालय.

८) श्रीमती सुजाता शिवाजी नागणे, कनिष्ठ लिपिक, सहायक संचालक, नगर रचना, सोलापूर शाखा.

९) श्री.पवन बाबुराव धांदरे, कनिष्ठ लिपिक, सहायक संचालक, नगर रचना, बुलडाणा शाखा.



प्रशा-१
३।१०।२२